

विधान सभा

महाराष्ट्र

# निलेश ज्ञानदेव लंके


सदस्य,विधानसभा महाराष्ट्र

२२४ पारनेर-नगर मतदार संघ

संपर्क कार्यालय : न्यु आर्ट्स कॉलेज शेजारी,पारनेर ता.पारनेर जि.अहमदनगर पिन : ४१४३०२ फोन- (०२४८८) २९५३३३

एल.आय.सी.ऑफीस समोर,ईगलप्राईड,बुरुडगांव रोड,अहमदनगर पिन : ४१४००१ मो.९८२२५१५२५८

Email Id : mlanileshlanke3333@gmail.com


जा.क्रं 11127 आ/का/नगर/2023 दिनांक 22/11/२०23

प्रति,
मा.ना.श्री.अजितदादा पवार साहेब,
उपमुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य मंत्रालय,
मुंबई-३२.

विषय :- जलसंधारण महामंडळ अंतर्गत खालील कोल्हापुरी बंधाऱ्याच्या कामांना प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत...

आदरणीय दादा,

उपरोक्त विषयान्वेय आपणास विनंती करण्यात येते कि माझ्या पारनेर – नगर मतदार संघातील शेतकऱ्यांच्या मागणी नुसार खालीलप्रमाणे कोल्हापुरी बंधाऱ्याची सर्वेक्षण करून अंदाजपत्रके तयार केलेली आहेत.

| अ.क्र. | तालुका | योजना | कामाचे नाव | अंदाजित कि. (लक्ष) |
|---|---|---|---|---|
| १. | ता.पारनेर | को.प.बं. | कोहकडी (टोणगे वस्ती) | १४०.०० |
| २. | ता.पारनेर | को.प.बं. | पिंप्री जलसेन (काळे इनाम) | ७८.०० |
| ३. | ता.पारनेर | को.प.बं. | वाळवणे (रोकडे दरा) | १६५.०० |
| ४. | ता.पारनेर | को.प.बं. | पानोली (भापकर मळा) | ६३.०० |
| ५. | ता.पारनेर | को.प.बं. | हत्तलखिंडी (गावठाण) | ८६.०० |
| ६. | ता.पारनेर | को.प.बं. | पुणेवाडी (महादेव मंदिर शेरी) | ११०.०० |
| ७. | ता.पारनेर | को.प.बं. | रेनवडी (टेंभी) | ७६.०० |
| ८. | ता.पारनेर | को.प.बं. | वडझिरे (पानसरे मळा) | ८३.०० |
| ९. | ता.पारनेर | को.प.बं. | कळस (मळजूत) | ९९.०० |
| १०. | ता.नगर | को.प.बं. | जखणगाव (वाळके वस्ती) | १५९.०० |
| ११. | ता.नगर | को.प.बं. | हिंगणगाव (पुला शेजारी) | १३२.०० |
| १२. | ता.नगर | को.प.बं. | सोनेवाडी (स्मशानभूमी जवळ) | ११९.०० |
| १३. | ता.पारनेर | को.प.बं. | रांधे (कॅनल जवळ) | १३१.०० |
| १४. | ता.पारनेर | को.प.बं. | वडनेर बु.(बाबर मळा) | १६८.०० |

तरी माझे पारनेर-नगर विधानसभा मतदार संघातील वरील कोल्हापुर पद्धतीच्या कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी देऊन निधी उपलब्ध करून देण्यात यावी हि विनंती.

कळावे,

आपला स्नेहांकित,

निलेश लंके

(निलेश ज्ञानदेव लंके)

० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर व नगर तालुक्यातील १२ को.प.बं योजनांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे.

**महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ**
**छत्रपती संभाजीनगर - ४३१००१**
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)
महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ निर्णय क्र. रू.सा.त/प्र.मा./प्र.क्र. ६६७२ / २५८८
दिनांक : १२ डिसेंबर, २०२३.

**संदर्भ :**

१) अप्पर आयुक्त जलसंधारण तथा मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, पुणे, कार्यालयाचे पत्र क्र. प्रशा-१ /४४०५,४२८०, दिनांक २०२३

२) शासन, जलसंपदा विभाग, परिपत्रक क्र. संकिर्ण-२००६ / (२६९/२००६) / जसंअ, मंत्रालय, मुंबई-४०००३२, दिनांक : २५.०४.२०१९.

**प्रस्तावना :**

अप्पर आयुक्त जलसंधारण तथा मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, पुणे, यांचे संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये, ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर व नगर तालुक्यातील १२ को.प.बं योजनांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबतचे प्रस्ताव महामंडळास सादर करण्यात आले आहेत.

त्याअनुषंगाने प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार, अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर व नगर तालुक्यातील १२ को.प.बं योजनांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची बाब महामंडळाच्या विचाराधीन होती.

**महामंडळ निर्णय :**

० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर व नगर तालुक्यातील १२ को.प.बं योजनांच्या, मृद व जलसंधारण विभागाच्या सन २०२२-२३ च्या दरसूचीवर आधारित कामाप्रित्यर्थ रु.११५७२१६८२/- (रुपये अकरा कोटी सत्तावन्न लक्ष एकवीस हजार सहाशे ब्याऐंशी फक्त) व अनुषंगिक खर्च रु.९९२०००९/- (रुपये नव्याण्णव लक्ष वीस हजार नऊ फक्त) अशा एकूण अंदाजित रु.१२५६४१६९१/- (रुपये बारा कोटी छपन्न लक्ष एकेचाळीस हजार सहाशे एक्याण्णव फक्त) किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सोबत परिशिष्ट-०१ मध्ये योजनांची यादी व गोषवारा जोडण्यात आलेला आहे.

सदर योजनांच्या प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकानुसार एकूण साठवण क्षमता ७२२.१४ स.घ.मी. असून, नियोजित एकूण सिंचन क्षमता २८७ हेक्टर इतकी आहे.

सदर योजनांच्या कामावरील खर्च, हा महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकडून उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या निधीतून केला जाईल.

तसेच सदर योजनेस खालील अटीच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१) शासन निर्णय दिनांक ३१ जुलै, २००० अन्वये या योजनेसाठी लाभधारकांची पाणी वापर संस्था स्थापन करणे अनिवार्य राहील. पाणी वापर संस्थेमार्फत देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी हस्तांतर करण्यास सहमती असल्याबाबत संबंधीत ग्रामसभेच्या ठरावाद्वारे मान्यता घेणे आवश्यक आहे.

२) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक : नागरी-२०११ / प्र.क्र.१९२ / निधी / जल-१, दिनांक ०२ फेब्रुवारी, २०१२ अन्वये विहित तरतूदींचे पालन करण्यात यावे.

(क्र.मा.प.....)

३) प्रचलित शासन निर्णय, नियम, मार्गदर्शक सूचना व विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन योजनेच्या कामाची निविदा कार्यवाही करावी व प्राप्त निविदा मंजुरीसाठी महामंडळास सादर करावी.

४) कामे पूर्ण करुन योजना देखभाल दुरुस्तीसाठी नियमानुसार हस्तांतरीत करावी.

५) प्रकल्पासाठी भूसंपादन प्रक्रीया प्रथम प्राधान्याने पुर्ण करण्यात यावी.

सदर योजनेच्या कामावरील खर्च खालील लेखाशिर्षातून भागविण्यात यावा.

**लेखाशिर्ष :**

मागणी क्रमांक - झेडएच - ५
प्रधान लेखा शिर्ष ४४०२, मृद व जलसंधारण यावरील भांडवली खर्च,
१९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांतील गुंतवणुका,
(०१) भागभंडवली अंशदान (०१) (०१) महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाला भाग भांडवली अंशदान,
(४४०२ २८२३), ३२, अंशदाने (दत्तमत) (योजनांतर्गत)

सदर महामंडळ निर्णय, कार्यकारी समितीच्या दिनांक ०४.१२.२०२३ रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील विषय क्र. ०३ अन्वये पारित ठरावाच्या अनुषंगाने, महामंडळाचे पत्र क्र.मजसंम/तांशा-३ / का.स.बै.०४.१२.२३ कार्यवृत्त/ २४४८/ सह / २०२३, दिनांक : ११.१२.२०२३ अन्वये, निर्गमित केलेल्या कार्यवृत्तानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

(सु. पां. कुशिरे)
व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ
छत्रपती संभाजीनगर

सोबत :- परिशिष्ट - ०१

**प्रतिलिपी - परिशिष्ट - ०१ सह.**

१) मा. अपर मुख्य सचिव, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय मुंबई - ४०० ०३२.
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४) खाजगी सचिव, मा. मुख्यमंत्री तथा मंत्री, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय मुंबई - ४०० ०३२.
५) अप्पर आयुक्त जलसंधारण तथा मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, पुणे -४४०००३.
सोबत - वरीलप्रमाणे अंदाजपत्रक.
६) प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नाशिक
७) जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, अहमदनगर
८) महामंडळ कार्यालय, लेखा शाखा क्र.१
९) महामंडळ कार्यालय-संग्रहार्थ.

परिशिष्ट - ०१

महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ निर्णय क्र. रू.सा.त/प्र.मा./प्र.क्र. ६६७४ / २५८८ दिनांक : १२ डिसेंबर, २०२३. चे सहपत्र

० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर व नगर तालुक्यातील १२ को.प.बं योजनांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे.

| अ.क्र | योजनेचा प्रकार | योजनेचे नाव | तालुका | जिल्हा | कामाप्रित्य खर्च (रुपये) | अनुषंगिक खर्च (रुपये) | एकुण अंदाजित किंमत (रुपये) | साठवण क्षमता (स.घ.मी.) | जलसाठा किंमत/ स.घ.मी. | प्रचलित मापदंड/ स.घ.मी. | लाभ व्यय गणोत्तर | आर्थिक परतावा दर | सिंचन क्षमता (हे.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| १ | को.प.बं | कळस (मळजूट) | पारनेर | अहमदनगर | ८७९७१०० | ७४४३३३ | ९५४१४३३ | ६०.२६ | १५८३३८ | १७८८१० | २०.७८ | १.१२ | १४ |
| २ | को.प.बं | वाळवणे (रोकडे दरा) | पारनेर | अहमदनगर | १५०३६५१३ | १४९७६५१ | १६५३४१६४ | ९३.३८ | १७७०६३ | १७८८१० | १.१९ | १६.४२ | ३७ |
| ३ | को.प.बं | पिंप्री जलसेन (काळे इनाम ) | पारनेर | अहमदनगर | ७४२३५०४ | ३६८१७५ | ७७९१६७९ | ४४.०२ | १७७००३ | १७८८१० | १.१६ | १६.०० | १७ |
| ४ | को.प.बं | कोहकडी (टोणगे वस्ती) | पारनेर | अहमदनगर | ९५८३७६९ | ९५८३७६ | १०५४२१४५ | ६१.४१ | १७१६६८ | १७८८१० | १.०४ | १३.१३ | २१ |
| ५ | को.प.बं | जखणगाव (वाळके वस्ती) | नगर | अहमदनगर | १४४०४२१४ | १४३४४२१ | १५८३८६३५ | ८९.१४ | १७६१०२ | १७८८१० | १.१७ | १६.१७ | ३५ |
| ६ | को.प.बं | हिंगणगाव (पुलाशेजारी) | नगर | अहमदनगर | ११९४७१५७ | ११८८७१६ | १३१३५८७३ | ७४.९७ | १७५२१५ | १७८८१० | १.१७ | १६.३५ | २९ |
| ७ | को.प.बं | रेणवडी (टेंभी) | पारनेर | अहमदनगर | ६७७७६३० | ६७७७६२ | ७४५५३९२ | ४५.४६ | १६३९९८ | १७८८१० | १.०९ | १५.६७ | ३५ |
| ८ | को.प.बं | सोनेवाडी(स्मशानभुमी | नगर | अहमदनगर | १०७६४४३५ | १०७०४४४ | ११८३४८७९ | ६६.९८ | १७६६९३ | १७८८१० | १.१६ | १६.२६ | २६ |
| ९ | को.प.बं | हत्तलखिंडी (गावठाण) | पारनेर | अहमदनगर | ८१६०३९७ | ४०५०२० | ८५६५४१७ | ४८.१५ | १७७८९० | १७८८१० | १.१८ | १६.२५ | १९ |
| १० | को.प.बं | वडझिरे (पानसरे मळा) | पारनेर | अहमदनगर | ७८५९६५० | ३८९९८३ | ८२४९६३३ | ४६.६७ | १७६७६५ | १७८८१० | १.१६ | १६.०० | १८ |
| ११ | को.प.बं | पुणेवाडी (महादेव | पारनेर | अहमदनगर | ८९१५२३५ | ८८५५२४ | ९८००७५९ | ५५.१५ | १७७७११ | १७८८१० | १.१९ | १६.४२ | २२ |
| १२ | को.प.बं | पानोली (भापकर | पारनेर | अहमदनगर | ६०५२०७८ | २९९६०४ | ६३५१६८२ | ३५.७५ | १७७६६९ | १७८८१० | १.१७ | १६.१७ | १४ |
| | | एकुण | ० | योजना | ११५७२१६८२ | ९९२०००९ | १२५६४१६९१ | ७२२ | | | | | २८७ |

(सु. पां. कुशिरे)
व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ